पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: ०९/०४/२०२०**

## सोशलमिडीयाव्दारे अफवापसरविणाऱ्यांवर होणार कडक कारवाही

महाराष्ट्रसह देशभरात कोविड-१९ या संसर्गजन्य विषाणुने विखळा घातला आहे. परंतु कोरोनाच्या पार्श्वभुमीवर शोसलमिडीया मार्फत मोठ्या प्रमाणात व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंन्स्टाग्राम, टिकटॉक व ईतर माध्यमातुन खोट्या अफवा पसरविल्याजात असल्याचे दिसुन येते. त्यामुळे शोसलमिडीयाचे वापर करणाऱ्यांना गडचिरोली पोलीस दलातर्फे खालील प्रमाणे आवाहान करण्यात येत आहे.

१) व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंन्स्टाग्राम, टिकटॉक व ईतर शोसलमिडीयावर कोरोनाबाबत कोणतीही खोटी बातमी किंवा अफवा पसरविली जाईल असे आक्षेपार्ह पोस्ट करुनये.
२) दोन समाजात तेढ निर्माण होईल असा कोणताही संदेश, फोटो, व्हिडीओ ईत्यादी पोस्ट करनये.
३) एखादी अफवा पसरविणारी पोस्ट असल्यास ती कोणालाही फारवर्ड करुनये.
४) जुने व्हिडीओ टाकुन त्याखाली कोणतेही कॉमेंट्स करुन खोटी अफवा पसरवुनये. वरीलप्रमाणे कोणतीही कृतीकेल्यास त्यांचेवर विविध कायद्यान्वये गुन्हे दाखल होवुन अशा इसमांना अटक करण्यात येईल.

**<u>तसेच सध्या सायबर गुन्हेगार हे उद्भवलेल्या परिस्थितीचा फायदाघेवुन खालील प्रमाणे तुमची फसवणुक करुन तुमचे आर्थिक नुकसान करु शकतात.</u>**

१) मोबाईल मध्ये ॲप डाऊनलोड केल्याने तुम्हाला करोना संशयित आपले जवळ आल्यास मोबाईल व्हायब्रेट करेल असे सांगितले जाईल. आपण असे कोणतेही ॲप डाऊनलोड करुनका.
२) आपले कर्जाचे हप्ते भरण्याची आवश्यकता नाही मी बँकेतुन बोलतो असे फोनकॉल असल्यास त्यांना आपली कोणतीही माहिती किंवा ओटीपी (OTP) क्रमांक देवुनका.
३) तुमचे PAYTM अकाउंट बंद झाले ते आम्ही चालु करुन देतो अश्या फसव्या कॉलला कोणताही प्रतिसाद देवुनका.
४) उद्भवलेल्या परिस्थितीत तुम्हाला आर्थिक मदत हि QR कोडव्दारे होणार आहे. असे कॉल आल्यास कोणतेही QR कोड स्कॅन करुनका.
५) सरकारी योजनांची नोंदणीबाबत लिंक आल्यास ते क्लिक करुनये.